Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# अटल बिहारी वाजपेयी यांचे रशिया बरोबर असलेले परराष्ट्र धोरण : एक अभ्यास

**जाधव विश्वजीत हणमंतराव**
संशोधक
(एम.ए. राज्यशास्त्र, बी.एड्., सेट)

**डॉ. पी. डी. सुर्यवंशी**
मार्गदर्शक
प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख
स्वा.सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय
पुर्णा जि. परभणी

**प्रस्तावना**

भारताच्या स्वातंत्र्यापूर्वीही भारत आणि सोव्हिएत संघाचे चांगले संबंध होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून सोव्हिएत रशिया बरोबर संबंध सहकार्याचे राहिले आहेत. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी सोव्हिएत संघाशी घनिष्ठ संबंध विकसित केले आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांनी त्याच प्रकारे चालविले. सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर रशिया जागतिक राजकारणात एक वेगळा घटक म्हणून उदयास आला. शीतयुद्धानंतरच्या वर्षांत भारताच्या रशियाशी असलेल्या संबंधांमध्ये मोठे बदल झालेले नाहीत. दुर्दैवाने, ११ आणि १३ मे, १९९८ रोजी पोखरण येथे भारताच्या अणुचाचण्यानंतर, मैत्रीपूर्ण संबंधांमध्ये काही प्रमाणात बदल झाला होता. अणुचाचणीनंतर रशियाचे राष्ट्राध्यक्ष येल्तसिन यांनी १२ मे १९९८ रोजी जाहीरपणे म्हटले की, "भारताने अणुस्फोट करून शांततेचा भंग केला आहे." रशियाने भारताच्या अणुचाचण्यांचा निषेध केला असला तरी त्याने भारतासोबतचे व्यापारी संबंध बिघडू दिले नाहीत किंवा भारतावर कोणतेही निर्बंध लादले नाहीत. द्विपक्षीय स्तरावर रशियाने भारताला आश्वासन दिले की अणुस्फोटामुळे कोणत्याही प्रकारच्या संबंधना तडा जाणार नाही. रशिया भारताला आपला 'सामरिक भागीदार' मानेल. भारत आणि सोव्हिएत रशिया यांच्यात अणुऊर्जा प्रकल्प बांधण्यासाठी १० वर्षांच्या जुन्या कराराला पूरक म्हणून कुडनकुलम येथे दोन हलक्या पाण्याच्या १००० MW क्षमतेच्या अणुभट्ट्या बांधण्यासाठी २१ जून रोजी नवी दिल्ली येथे रशियाचे अणुऊर्जा मंत्री येवगेनी अदामोव्ह यांनी स्वाक्षरी केली. अमेरिकेच्या दबावाला न जुमानता या पुरवणी करारावर स्वाक्षरी करण्यात आली. पुढे, लष्करी व तांत्रिक सहकार्यासाठी भारत-रशियनची बैठक नोव्हेंबर १९९८ मध्ये मॉस्को येथे झाली.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळातील रशियाबरोबर असलेल्या संबंधाचा अभ्यास करणे.
२. अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळातील रशियाबरोबर झालेल्या व्यापाराचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये विश्लेषणात्मक, ऐतिहासिक, सांख्यिकीय इत्यादी संशोधन पद्धती आहेत. तसेच भारताचे पराष्ट्र धोरण निर्धारणांच्या घटकांचा अभ्यास हा विषय ऐतिहासिक असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**भारत-रशिया संबंधात नवी सुरुवात: रशियन नेत्यांची भारत भेट**

२० ते २२ डिसेंबर १९९८ या कालावधीत रशियाचे नवे पंतप्रधान येवगेनी प्रिमाकोव्ह यांच्या भेटीमुळे भारत आणि रशियामधील मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ झाले. या भेटीने भारत आणि रशियन फेडरेशन यांच्यातील उच्चस्तरीय भेटी आणि द्विपक्षीय संवादांची देवाणघेवाण चालू झाली. या भारत दौऱ्यादरम्यान प्रिमकोव्ह यांनी भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्याशी सखोल चर्चा केली. नवी दिल्ली येथे दोन्ही बाजूंनी भारत आणि रशियातील वैज्ञानिक, तांत्रिक आणि औद्योगिक कौशल्यांची देवान घेवान करण्यासाठी सहमती झाली. यासोबतच दोन्ही देशांमध्ये सुरू असलेल्या आर्थिक बदलांमुळे निर्माण होणाऱ्या नव्या संधींचा एकत्रितपणे फायदा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. अशाप्रकारे, दोन्ही बाजूंनी धोरणात्मक भागीदारीकडे वाटचाल करण्याचे मान्य केले. तसेच मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रत्यार्पण करार, परस्पर कायदेशीर सहाय्यावरील करार यांसारख्या अनेक द्विपक्षीय कागदपत्रांवर या भेटीदरम्यान स्वाक्षरी करण्यात आली. क्रिमिनल मॅटर्स, कॉन्सुलर कन्व्हेन्शन, २०१० पर्यंत लष्करी-तांत्रिक सहकार्यावर दीर्घकालीन करार, व्यापार, आर्थिक, औद्योगिक, आर्थिक, विज्ञान आणि तंत्रज्ञान सहकार्याच्या विकासावरील संयुक्त दस्तऐवज, दळणवळण, हवाई क्षेत्र इत्यादीमध्ये करार झाले. डिसेंबर १९९८ ची रशियन प्रीमियर प्रिमकोव्ह यांची भारत भेट अतिशय महत्त्वाची होती. कारण १९९८ मध्ये अणुचाचणी घेतल्यावर भारताला भेट देणारे ते पहिलेच राष्ट्रध्यक्ष होते. दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी सुरू करण्याच्या दृष्टीकोनाने भारत आणि रशियामधील विद्यमान संबंधाना पुष्टी केली. रशिया, भारत आणि चीन यांच्यात सामरिक त्रिकोण तयार करण्याबाबत चर्चा केली आणि अमेरिकेच्या विरोधात एक मजबूत विरोधक म्हणून ठामपणे भूमिका बजावली. रशियाने भारताला लष्करी मदत दिल्याने भारत आणि रशिया यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांची गती सुरळीत चालू राहिली.

७ मे १९९९ मध्ये राजस्थानच्या वाळवंटात विस्तृत चाचण्यांसाठी T-९० च्या मुख्य लढाऊ टाकीचे रशियाने तीन भाग पाठविले. १० अत्याधुनिक Su-३०K मल्टी-रोल फायटर जेट्स भारताला देण्याचे जाहीर केले. १९९८ रोजी झालेल्या करारानुसार $३०० दशलक्ष किमतीचे चार लढावू विमाने भारताला देण्यात आली. भारत आणि रशिया यांच्यातील संरक्षण संबंध अधिक विकसित झाल्यामुळे पुतिन यांनी ३-५ ऑक्टोबर २००० रोजी रशियाचे राष्ट्राध्यक्ष म्हणून पहिल्यांदा भारताला भेट दिली. या काळात पुतिन यांच्या भारतभेटीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे भारत आणि रशिया यांच्यातील 'डिक्लेरेशन ऑफ स्ट्रॅटेजिक रिलेशनशिप'वर स्वाक्षरी केली. वाजपेयींनी ४ ऑक्टोबर २००० रोजी भारतातील संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये दोन्ही देशांमधील घोषणेवर स्वाक्षरी करताना म्हटले की, "भारत आणि रशियन फेडरेशनमधील धोरणात्मक भागीदारीमुळे दोन्ही देशांच्या संबंधांना औपचारिक स्वरूप आहे. बहुध्रुवीयता, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर आणि इतरांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याच्या तत्त्वांचे दोन्ही देशाकडून काटेखोरपणे पालन केले जाईल. मला खात्री आहे की, आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षा आणि स्थैर्य वाढल्यामुळे जागतिक पातळीवर दोन्ही देशांचे महत्त्व वाढणार आहे.

रशियन राष्ट्राध्यक्षांच्या भारत भेटीमुळे भारत सरकारचा आत्मविश्वास निश्चितच वाढला होता. याविषयी वाजपेयी यांनी ३ ऑक्टोबर २००० रोजी नवी दिल्ली येथे पत्रकार परिषदेत भारत आणि रशिया यांच्यातील द्विपक्षीय संबंधांचे महत्त्व स्पष्ट करताना म्हटले की, "नवीन शतकात आंतरराष्ट्रीय दहशतवाद, धार्मिक अतिरेकी,

अंमली पदार्थांची तस्करी आणि देशांतर्गत गुन्हेगारी हे मानव जातीसमोरील प्रमुख आव्हाने आहेत. एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेसाठी कायद्याने आणि त्यांच्या संबंधित घटनेत समाविष्ट केल्याप्रमाणे आम्ही निषेध करतो राज्य धोरणाचे साधन म्हणून दहशतवादाचा वापर कदापी करता येणार नाही. राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्या या भारत भेटीने भारत आणि रशिया यांच्यातील हितसंबंधांचे अभिसरण स्पष्टपणे प्रदर्शित केले. यामुळे दोन्ही देशांमधील विद्यमान द्विपक्षीय संबंध मजबूत झाले. दुसरे म्हणजे, धोरणात्मक भागीदारीवरील घोषणेवर स्वाक्षरी केल्याने प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर दोन्ही देशांच्या उद्दिष्टांचा स्पष्टपणे पुनरुच्चार करण्यात आला. तिसरे म्हणजे, या भेटीमुळे भारत आणि रशिया यांच्यातील संरक्षण संबंध मजबूत होण्यास मदत झाली. कारण रशिया हा भारताला लष्करी उपकरणांचा पुरवठा करणारा महत्त्वपूर्ण मीत्र आहे. चौथे, दोन्ही देशांनी दहशतवाद हा जागतिक शांततेसाठी एक धोका म्हणून सहज स्वीकारला आणि या गंभीर विषयावर एकमेकांना सहकार्य करण्याचे मान्य केले. पाचवे, भारत आणि रशिया यांच्यातील या सहकार्यामुळे काश्मीर समस्या, सुरक्षा परिषदेत भारताचे सदस्यत्व इत्यादी विशिष्ट मुद्यांवर संयुक्त राष्ट्रांमध्ये रशियाचा पाठिंबा मिळवण्यात भारताला मदत झाली. सहावे म्हणजे माजी पंतप्रधान प्रिमाकोव्ह यांच्याप्रमाणेच पुतिन यांनीही महत्त्व दिले. भारत आणि रशियामधील हे द्विपक्षीय संबंध दोन्ही देशांच्या मान्यवरांच्या अधिकृत भेटीमुळे अधिक विकसित झाले. ज्यामध्ये भारताचे तत्कालीन परराष्ट्र व्यवहार मंत्री जसवंत सिंग यांनी जून २००१ मध्ये मॉस्कोला भेट दिली होती. १० अब्ज डॉलरच्या दीर्घकालीन संरक्षण सहकार्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती. भेटी दरम्यान करार केवळ तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणावरच नव्हे तर भविष्यातील शस्त्रांच्या संयुक्त विकासावर आणि उत्पादनावरही केंद्रित होता.

**भारत आणि रशिया यांच्यातील आर्थिक सहकार्य**

अटलजिने भारत आणि रशिया यांनी संरक्षण तसेच आर्थिक क्षेत्रात घनिष्ठ द्विपक्षीय संबंध विकसित केले होते. भारतातील मोठे उद्योग, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी रशियाने मदत केली आहे. वाजपेयींनी २००१ मध्ये रशियाच्या दौऱ्यावर गेल्यानंतर मॉस्कोमध्ये पत्रकारांशी बोलताना वाजपेयींनी भारत आणि रशिया यांच्यातील आर्थिक विकास आणि सहकार्यावर बोलताना म्हणाले, "संयुक्त उत्पादन आणि उपकरणांचे विपणन यामुळे दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेतील पूरकतेमुळे एकत्र येण्यास मदत झाली आहे. तसेच द्विपक्षीय सहकार्यामुळे भारतीय उद्योगांमध्ये गुंतवणूकीसाठी रशियाकडून भांडवली उपकरणांच्या मदतीमुळेच लोह आणि पोलाद क्षेत्रात भारताची प्रगती झाली." डिसेंबर २००२ मध्ये रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन भारत दौऱ्यावर आले. या द्विपक्षीय बैठकीत आर्थिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक सहकार्यात वाढ करण्यासाठी ऐतिहासिक घोषणाही करण्यात आली. तसेच अर्थव्यवस्थांचे उदारीकरण, व्यापार आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वपूर्ण करार करण्यात आले.

वाजपेयींनी २००३ मध्ये रशियाला भेट दिली त्यावेळी दोन्ही देशातील संयुक्त सहकार्याबद्दल ते म्हणाले की, "भारत-रशिया आर्थिक सहकार्य बहुपक्षीय क्षेत्रात विस्तारले आहे. दोन्ही देशांच्या गरजांना प्रतिसाद देणारी संतुलित आणि समान जागतिक आर्थिक व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी बहुपक्षीय संस्थांच्या बळकटीकरणाला पाठिंबा दिला आहे. भारताचा रशियाच्या WTO मध्ये प्रवेशाला सक्रिय पाठिंबा दिला. आमच्या धोरणात्मक भागीदारीमुळे रशियाचे सदस्यत्व भारत आणि रशियामध्ये संतुलन आणि सामर्थ्य वाढविण्यास महत्त्वपूर्ण ठरणारे

आहे. भारत आणि रशिया यांच्या संयुक्त उपक्रमामुळेच भारताचा आर्थिक विकास झाल्यामुळे अटलबिहारी वाजपेयी यांनी रशियाच्या भूमिकेचे कौतुक केले. २००३ रोजी मॉस्कोत भारतीय आणि रशियन व्यावसायिक व्यक्तींच्या व्यावसायिक बैठकीदरम्यान अटलबिहारी वाजपेयी म्हणाले की, "भारत आज आयटी क्षेत्रात जगातील प्रमुख आघाडीच्या देशांपैकी एक आहे. भारताचा आयटी क्षेत्रात विकास होण्यासाठी रशियाच्या माहिती तंत्रज्ञानाची आवश्यक तेव्हा मदत मिळाली आहे.[५८]

**१९९७ ते २००५ पर्यंत भारत-रशिया यांच्यातील व्यापारविषयक आयात व निर्यातीच्या माहितीचा तक्ता**

भारताचे पंतप्रधान म्हणून वाजपेयी यांच्या कार्यकाळात भारत आणि रशिया यांच्यातील आर्थिक विकासात झालेल्या आर्थिक व्यापाराचे खालील तक्त्यात माहिती देण्यात आली आहे.

मूल्ये यू.एस.ए. दशलक्ष $ मध्ये

| वर्ष | निर्यात | आयात | एकूण व्यापार | व्यापाराचा समतोल |
|---|---|---|---|---|
| १९९७-९८ | ९५२.९७ | ६४३.१२ | १,५९६.०९ | ३०९.८५ |
| १९९८-९९ | ७०९.४२ | ५४५.५४ | १,२५४.९६ | १६३.८८ |
| १९९९-२००० | ९४७.९२ | ६२३.१८ | १,५७१.१० | ३२४.७४ |
| २०००-०१ | ८८९.०१ | ५१७.६६ | १,४०६.६७ | ३७१.३५ |
| २००१-०२ | ७९८.१८ | ५३५.५१ | १,३३३.६९ | २६२.६७ |
| २००२-०३ | ७०४ | ५९२.६१ | १,२९६.६१ | १११.३९ |
| २००३-०४ | ७१३.७५ | ९५९.६३ | १,६७३.३८ | -२४५.८८ |
| २००४-०५ | ६३१.२६ | १,३२२.७४ | १,९५४.०० | -६९१.४८ |



तक्ता व स्तंभालेखामध्ये १९९७ ते २००५ पर्यंत भारत-रशिया यांच्यातील व्यापारविषयक आयात व निर्याती माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, २००३- ०४ मध्ये रशियाला भारताची निर्यात एकूण US$ ७१३.७५ दशलक्ष होती आणि डॉलरच्या दृष्टीने त्यात १.३९ % ची नाममात्र वाढ दिसून येते. २००२-०३ च्या तुलनेत रुपयाच्या बाबतीत ३.७३ % ची घसरण झाली. या कालावधीत रशियामधून भारतीय आयातीत रुपयाच्या दृष्टीने ५३.७६ % आणि डॉलरच्या बाबतीत ६१.९३ % वाढ झाली ती एकूण US$ ९५९.५ दशलक्ष इतकी आहे. २००४-२००५ मध्ये भारतीय निर्यात एकूण US$ ६३१.२६ दशलक्ष होती. तर आयात US$ १,३२२.४७ दशलक्ष होती. २००२-२००३ पर्यंत व्यापार संतुलन भारताच्या बाजूने होता. परंतु २००३-२००५ पर्यंत व्यापाराचे पारडे रशियाकडे घसरले. २००४-२००५ मध्ये एकूण व्यापार US$ १,५९६.०९ दशलक्ष वरून US$ १९५४.०० दशलक्ष पर्यंत वाढला होता. आयाव व निर्यातीवरून असे स्पष्ट होते की, १९९७ ते २००५ पर्यंत आयात किंवा निर्यातीमध्ये सातत्याने चढ किंवा उत्तार झालेला दिसून येतो. २०९९ नंतर भारताच्या निर्यामध्येतीमध्ये घट  झाल्याने रशियाच्या निर्यातीमध्ये वाढ झाली आहे. २००३ नंतर रशियाच्या व्यापारामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. एकंदरीत अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात रशिया बरोबरच्या आर्थिक व्यापारात २००३ ते ०५ चा अपवाद वगळता भारताची निर्यात मोठ्या प्रमाणात झालेली दिसून येते.

**रशिया बरोबर द्विपक्षीय संबंधांचे नूतनीकरण**

भारत आणि रशिया यांच्यातील घनिष्ठ द्विपक्षीय संबंधांच्या विकासाची सुरुवात नोव्हेंबर २००१ मध्ये राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या रशिया भेटीपासून झाली. ही भेट वाजपेयी आणि पुतिन यांनी ऑक्टोबर २००० रोजी धोरणात्मक भागीदारी जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करताना घेतलेल्या निर्णयानुसार होती. इतर महत्त्वाच्या द्विपक्षीय मुद्द्यांव्यतिरिक्त भारतादरम्यान आंतरराष्ट्रीय दहशतवादावरील मॉस्को जाहीरनाम्यावर स्वाक्षरी हा या भेटीचा महत्त्वपूर्ण परिणाम होता. याशिवाय, इतर क्षेत्रात सहकार्य मजबूत करण्यासाठी अनेक द्विपक्षीय दस्तऐवजांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आणि धोरणात्मक मुद्द्यांवर संयुक्त निवेदनावरही सहमती झाली. व्यापाराचा सर्वसमावेशक आढावा आणि भारत आणि रशिया यांच्यातील आर्थिक संबंधावरही चर्चा झाली. नोव्हेंबर २००१ मध्ये वाजपेयींच्या दौऱ्यात गुंतवणुकीला चालना देणे, व्यापार वाढवणे तसेच भारत आणि रशिया यांच्यातील व्यापाराला चालना देण्यासाठी अडथळे दूर करणे यावर लक्ष केंद्रित करण्यावर सहमती दर्शवण्यात आली. दोन्ही देशाच्या ऊर्जा क्षेत्रात तेल आणि नैसर्गिक वायू सहभागावरील कराराच्या निष्कर्षाचे स्वागत केले. याशिवाय, दोन्ही देशांनी अणुऊर्जा तसेच बाह्य अवकाशाच्या शांततापूर्ण वापरात सहकार्य सुरू ठेवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या संदर्भात भारतातील कुडनकुलम प्रकल्पाच्या (अणुऊर्जा प्रकल्प) अंमलबजावणीवर करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

नोव्हेंबर २००१ च्या रशियाच्या या भेटीदरम्यान वाजपेयींनी भारत आणि रशियामधील अनेक दशकांपासून असलेल्या विद्यमान संबंधाबद्दल म्हटले की, "दोन्ही देशातील दीर्घकाळापासूनचे संबंध  बदललेल्या परिस्थितीतही मीत्रत्वाचे राहिले आहेत. दोन्ही देशांमधील परस्पर विश्वास आणि एका स्थिर राष्ट्राच्या जडणघडणीसाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. याशिवाय, दहशतवाद आणि अफगाणिस्तानची परिस्थिती बाबत भारत आणि रशियाच्या संयुक्त भूमिकेबद्दल पत्रकारांशी बोलताना वाजपेयी म्हणाले की, अफगाणिस्तानच्या

समस्यांवर दोन्ही देशांनी सकारात्मक चर्चा केली आहे. तालिबानचे उच्चाटन झाल्यानंतर अफगाणिस्तानच्या सरकारी संरचनेची उभारणी करण्यासाठी भारत आणि रशियाची भूमिका समान आहे.वाजपेयी त्यांच्या दौऱ्यात नोव्हेंबर २००१ रोजी मॉस्को येथे पत्रकार परिषदेत म्हणाले की, "गेल्या तीन दिवसांत मी राष्ट्राध्यक्ष पुतिन आणि इतर रशियन नेत्यांसोबत विविध द्विपक्षीय आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवर अत्यंत उपयुक्त चर्चा केली आहे. अणुऊर्जा, विज्ञान आणि तंत्रज्ञान, व्यापार, आर्थिक सहकार्य आणि गुंतवणुक इत्यादीमुळे दोन्ही राष्ट्रांच्या उभारणीत महत्त्वपूर्ण बदल होणार आहे.

एकंदरीत अटलबिहारी वाजपेयींच्या मॉस्को भेटीमुळे भारताला खालीलप्रमाणे फायदा झाला आहे.

१. पोखरण-II अणुचाचणीनंतर दोन्ही देशांमधील संबंधांना पुन्हा आकार देण्यासाठी वाजपेयीचा दौरा हे एक महत्त्वपूर्ण पाऊल होते.
२. आंतरराष्ट्रीय दहशतवादावरील मॉस्को जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करणे हे भारत आणि रशियाने सर्व प्रकारच्या दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आणि जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्तपणे मान्य केलेले एक महत्त्वाचे पाऊल होते यात शंका नाही.
३. वाजपेयींच्या या दौऱ्यात दोन्ही देशांमधील सहकार्याबाबत इतर महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. ज्यामुळे केवळ संरक्षण क्षेत्रच नव्हे तर आर्थिक क्षेत्रही वाढले. त्यामुळे भारत आणि रशिया यांच्यातील तत्कालीन विद्यमान घनिष्ठ द्विपक्षीय संबंधांना पुन्हा पुष्टी देणारी होती.

**सारांश**

एकंदरीत भारताच्या अणुचाचणीबद्दल रशियन नेत्यांची सुरुवातीची प्रतिक्रिया कठोर असली तरीही या प्रकरणाच्या संदर्भात कोणतेही गंभीर पाऊल उचलले गेले नाही. तर वाजपेयी आणि पुतीन या दोन्ही नेत्यांनी भारत आणि रशियामधील वाढत्या सहकार्याला नेहमीच पाठिंबा दिला. शिवाय भारताच्या लष्करी प्रगतीसाठी रशियाचा पाठिंबा भारताच्या स्वातंत्र्यापासूनच राहिला आहे. रशियाने नेहमीच लष्कारांच्या संदर्भात शस्त्रास्त्रे आणि इतर संरक्षण उपकरणांच्या निर्मितीमध्ये मदत केली आहे. एवढेच नाही तर भारत आणि रशिया यांच्यातील मैत्रीचे पर्व नेहरू, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी त्यानंतर मनमोहन सिंग ते समकालिन स्थितीमध्ये नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत कायम राहिली आहे. यावरून जागतिक पटलावर भारताचा सर्वात मोठा आणि विश्वासू मीत्र म्हणून रशियाला ओळखले जाते. सुरक्ष परिषदेमध्ये भारताच्या वादग्रस्त प्रश्नावर रशियाने भारताच्या बाजूने उभे टाकून मीत्रत्वाचे संबंध दृढ केलेले दिसून येते.

**संदर्भग्रंथ**

१. वार्षिक अहवाल: १९९९-२०००, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, २०००,
२. Prime Minister's statement at the meeting of both the Houses of Parliament in Honour of Vladimir Putin President of Russian Federation, on 4 October, 2000,
३. Opening statement by Prime Minister Atal Bihari Vajpayee at the Joint Press Conference, during the visit of President Putin to India, 3 October, 2000

૪. Anjali Ghosh Statement by Prime Minster Atal Bihari Vajpayee at a Press briefing in Moscow, 7 November, 2001,

૫. Prepared by the author from various Annual Volumes tables of Foreign Trade Statistics of India Ministry of Commerce and Industry, Government of India, Kolkata, From April-March 1997-98 to 2004-05.

૬. Joint Statement after the meeting between the Prime Minister Atal Bihari Vajpayee and the Russian President Vladimir Putin, Kremlin, Moscow, 6 November, 2001

૭. Joint Statement after the meeting between the Prime Minister Atal Bihari Vajpayee and the Russian President Vladimir Putin, Kremlin, Moscow, 6 November, 2001

૮. Speech of Prime Minister Atal Bihari Vajpayee at the Banquet at Kremlin during his visit to Russia, 7 November, 2001

૯. Prime Minster Atal Bihari Vajpayee at a Press briefing in Moscow, 7 November, 2001.